।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।
४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३
RNI NO.
MAH/MAR/2004/16467
POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026
FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि ३० ऑगस्ट २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३५ वा

झटपट श्रीमंत होण्याचा मोह नडला

पनवेल सराफ दुकानात काम करणाऱ्या खिलारवाडीतील तरुणाला घेतले ताब्यात;सुमारे ६६ लाख ६२ हजार रुपये किमतीचे सोने हस्तगत

सांगोलाः झटपट श्रीमंत होण्याच्या मोहापायी पनवेल येथील सराफ दुकानात काम करणाऱ्या सांगोला तालुक्यातील तरुणाने तब्बल ६६६.२३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या सहा लगडी घेऊन पलायन केले. या घटनेचा पनवेल शहर पोलिसांनी ४८ तासांत छडा लावत खिलारवाडी येथून शुभम मानाजी खिलारे (वय २०) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे ६६ लाख ६२ हजार रुपये किमतीचे सोने हस्तगत केले.

पनवेल शहरातील गोकुळ गोल्ड बिल्डिंग, झवेरी बाजार येथे रोशन रावसाहेब कोळेकर यांचे स्वरूप रिफायनरी नावाचे सोनाराचे दुकान आहे. या ठिकाणी सोन्याचे दागिने शुद्ध करण्याचे काम केले जाते. सांगोला तालुक्यातील खिलारवाडी येथील शुभम खिलारे हा मागील आठ महिन्यांपासून या दुकानात काम करीत होता.

दि.२० ऑगस्ट रोजी शुभम याच्याकडे दुकानातील ६६६.२३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या सहा लगडी शुद्धता तपासण्यासाठी देण्यात आल्या होत्या. मात्र, बराच वेळ उलटूनही तो दुकानात परतला नाही. त्यामुळे दुकान मालक कोळेकर यांनी त्याच्या मोबाइलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता मोबाइल बंद असल्याचे आढळले. यानंतर त्यांनी हॉलमार्कचे स्वप्निल सावंत यांच्याशी संपर्क साधला. त्यावेळी शुभम हा दहा मिनिटांपूर्वी सोन्याची शुद्धता तपासून गेल्याचे सावंत यांनी सांगितले. त्यामुळे कोळेकर यांनी शुभमच्या मित्रांकडे त्याची चौकशी करून शोध घेण्याचा प्रयत्न केला. अखेर कोळेकर यांनी शुभम खिलारे याच्याविरुद्ध पनतेल शहर पोलिसांत धाव घेतली.

पनवेल शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाळा कुंभार यांनी विविध पथके तयार करून संशयिताचा शोध घेण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांनी पनवेल शहर तसेच रेल्वे स्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यावेळी शुभम हा रेल्वेने कुडुवाडी येथे उतरल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी त्याचा माग काढत सांगोला तालुक्यातील खिलारवाडी गाठली आणि शुभम खिलारे याला ताब्यात घेतले.

अवैध वाळू उपसा प्रकरणी गुन्हा दाखल; २ लाखांचा टेम्पो जप्त

सांगोला : सांगोला तालुक्यातील वाटंबरे हद्दीतील माण नदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतूक करणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत अंदाजे २ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तहसील कार्यालय सांगोला अंतर्गत यलमार मंगवाडी येथील ग्राम महसूल अधिकारी उमेश वसंतराव सूर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १२ जून २०२६ रोजी पहाटे ४:३० च्या सुमारास मंडळ अधिकारी व महसूल पथकाने वाटंबरे हद्दीतील माण नदी पात्रात अवैध वाळू उत्खननाविरोधात कारवाई केली. यावेळी एक पिकअप क्रिम रंगाचा ४०७ टेम्पो (एमएच-०९-१९८६) वाळू वाहतूक करताना आढळून आला.

चौकशीअंती संबंधित वाहन हे गजेंद्र विठ्ठल मासाळ (रा. यलमार मंगवाडी, ता. सांगोला) यांचे असल्याचे निष्पन्न झाले. वाहनासह अंदाजे अर्धा ब्रास वाळू जप्त करून तहसील कार्यालयाच्या आवारात जमा करण्यात आली होती. त्यानंतर वरिष्ठांच्या आदेशानुसार सांगोला पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. या प्रकरणात सुमारे २ लाख रुपये किंमतीचा ४०७ टेम्पो व २ हजार ५०० रुपये किंमतीची वाळू असा एकूण २ लाख ०२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

संबंधित आरोपीने कोणतीही शासकीय परवानगी अथवा रॉयल्टी न भरता माणनदी पात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून शासनाचे नुकसान केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल दादासाहेब माने करीत आहेत. माणनदी पात्रातील अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी महसूल विभागाने केलेल्या कारवाईत वाहनासह वाळू जप्त करण्यात आली.

महुद बु. येथील सुनेचा मृतदेह न घेतल्याने दंड; जात पंचायतीचा फतवा; सांगोल्यात गुन्हा दाखल

सांगोला : सुनेच्या मृत्यूनंतर अंत्यविधीसाठी तिचा मृतदेह ताब्यात न घेतल्याच्या कारणावरून जात पंचायतीने २० लाख रुपयांचा दंड ठोठावल्याची तक्रार महुद बु. येथील बाळू रामा माने यांनी सांगोला पोलिस ठाण्यात केली आहे. दंडाची रक्कम भरेपर्यंत स्वतः सह कुटुंबाला समाजातून बहिष्कृत केल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. तसेच मांत्रिकाकडून जादूटोणा करून मानसिक त्रास दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी बाळू रामा माने यांच्या फिर्यादीवरून वामन कोंडीबा माने, सीताराम चिन्नाप्पा निंबाळकर, विजय नारायण निंबाळकर, बाळू भीमराव चव्हाण, दुर्गाप्पा भीमराव चव्हाण, सुखदेव शंकर निंबाळकर, स्वप्नील आव्हाडे यांच्याविरुद्ध सांगोला पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, माने यांची सून शारदा २०२० पासून आजारी होती. तिच्यावर विविध रुग्णालयांत उपचार सुरू होते. तिच्या माहेरील व्यक्तींचा मांत्रिक स्वप्नील आव्हाडे याच्यावर विश्वास असल्याने फेब्रुवारी २०२२ च्या सुमारास शारदाला धार्मिक विधीसाठी त्याच्याकडे नेण्यात आले होते. त्यानंतर नोव्हेंबर २०२२ मध्ये शारदाचा आजाराने मृत्यू झाला.

शारदाच्या मृत्यूनंतर अंत्यविधीसाठी मृतदेह ताब्यात घेण्याची वेळ आली असता, आपली मानसिक स्थिती ठीक नसल्याने तसेच मुलगा तानाजी ऊसतोडीसाठी बाहेर गेल्यामुळे मृतदेह ताब्यात घेतला नसल्याचे माने यांनी फिर्यादीत नमूद केले आहे. दरम्यान, जुलै २०२६ मध्ये त्यांनी सुनेच्या मृत्यूबाबत न्याय मिळावा, अशी मागणी समाजातील व्यक्तींकडे केली. त्यानंतर ३० जुलै रोजी सांगोला न्यायालयाच्या मागील बाजूस जात पंचायत भरविण्यात आली. यावेळी सुनेचा मृतदेह अंत्यविधीसाठी ताब्यात न घेतल्याच्या कारणावरून पंचांनी माने यांना २० लाख रुपयांचा दंड ठोठावल्याचा आरोप आहे.

दंडाची रक्कम भरेपर्यंत माने यांच्यासह त्यांच्या कुटुंबाला समाजातून बहिष्कृत केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. त्यानंतर महुद येथे जात पंचायत भरवून पोलिस ठाण्यात तक्रार न करण्याची धमकी देण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच महुद येथील मरीआई देवीच्या यात्रेदरम्यान मिरवणुकीत सहभागी होण्यास मज्जाव केल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास सांगोला पोलिसांकडून सुरू असून, जात पंचायतीच्या माध्यमातून दंड व सामाजिक बहिष्काराच्या

मुक्त विचार

विचारधन

जातीभेद आणि वर्णभेद हे समाजाला लागलेले कलंक आहेत, ते मुळापासून उपटून टाकले पाहिजेत.जन्माने कोणीही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरत नाही, तर माणसाचे कर्तृत्व त्याला श्रेष्ठ बनवते.

-महात्मा जोतीबा फुले

रक्षाबंधन : धागा नात्यांचा, जबाबदारी माणुसकीची

श्रावणातील पौर्णिमा आली की घराघरांत एक वेगळीच लगबग सुरू होते. हातात राखी, कपाळावर कुंकवाचा टिळा, औक्षणाचे ताट, मिठाईचा गोडवा आणि डोळ्यांत भावनांचा ओलावा. रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नाही; तो प्रेम, विश्वास, जिव्हाळा आणि परस्पर जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे. हातावर बांधला जाणारा राखीचा धागा दिसायला छोटा असतो, पण त्यात एका बहिणीची माया आणि भावाच्या संरक्षणाची जबाबदारी गुंफलेली असते. मात्र आज प्रश्न एवढाच आहे, राखी बांधून संरक्षणाचे वचन देणे पुरेसे आहे का? बहिणीच्या हाताला राखी बांधताना तिच्या स्वातंत्र्याचा, सन्मानाचा आणि सुरक्षिततेचा विचारही केला पाहिजे. कारण संरक्षण म्हणजे तिच्यावर बंधने लादणे नव्हे, तर तिला स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी बळ देणे होय. तिच्या शिक्षणाला पाठबळ देणे, तिच्या स्वप्नांना दिशा देणे आणि तिच्या निर्णयांचा आदर करणे, हेच खरे रक्षाबंधन!

आजच्या काळात मुली उच्च शिक्षण घेत आहेत, अंतराळात झेपावत आहेत, सैन्यात सेवा देत आहेत, प्रशासनात नेतृत्व करत आहेत, उद्योग उभारत आहेत. मग 'तू मुलगी आहेस' म्हणून तिच्या स्वप्नांना कुंपण का? तिच्या कपड्यांवर, मित्रमैत्रिणींवर, करिअरवर, विवाहाच्या निर्णयावर आणि आयुष्याच्या निवडीवर नियंत्रण ठेवणे याला संरक्षण म्हणायचे का? नाही! हे संरक्षणाच्या नावाखाली स्वातंत्र्यावर घातलेले बंधन आहे. रक्षाबंधनाचा खरा अर्थ समाजाने नव्याने समजून घेण्याची गरज आहे. आज अनेक बहिणी घरापासून दूर आहेत. काही शिक्षणासाठी, काही नोकरीसाठी, काही संसारासाठी तर काही आपल्या स्वप्नांच्या शोधात हजारो किलोमीटर दूर गेल्या आहेत. मोबाईलच्या पडद्यावरून आलेली 'हॅपी रक्षाबंधन'ची शुभेच्छा, ऑनलाइन पाठवलेली राखी आणि डिजिटल पेमेंटमधून आलेली ओवाळणीची रक्कम, या सगळ्यामुळे अंतर कमी झाले आहे; पण भावनिक जवळीक टिकवण्याची जबाबदारी अजूनही आपलीच आहे. कधी काळी भाऊ बहिणीच्या रक्षणाची शपथ घेत असे. आज काळ बदलला आहे. आता बहीणही भावाच्या आयुष्याची ताकद आहे आणि भाऊही बहिणीच्या स्वप्नांचा साथीदार आहे. त्यामुळे हे नाते एकतर्फी संरक्षणाचे नसून परस्पर आधाराचे झाले पाहिजे.

राखीचा धागा जात, धर्म, भाषा, श्रीमंती-गरिबी यापलीकडे जाणारा आहे. इतिहासातही राखीने माणुसकीचे बंध जोडले आहेत. म्हणूनच आज रक्षाबंधनाच्या निमित्ताने समाजाने एका व्यापक प्रश्नाकडे पाहिले पाहिजे, आपण आपल्या बहिणीचे रक्षण करतो, पण शेजारच्या मुलीच्या सन्मानाचे काय? आपल्या घरातील स्त्रीला सुरक्षित ठेवतो, पण सार्वजनिक ठिकाणी एखाद्या महिलेशी गैरवर्तन होताना आपण गप्प का बसतो? राखी जर मनगटावर बांधली आणि माणुसकी मात्र मनात बांधली नाही, तर त्या राखीचा अर्थ अपुरा आहे. स्त्रीसुरक्षेची जबाबदारी केवळ भावाची नाही. ती कुटुंबाची, समाजाची आणि शासनाचीही आहे. मुलींना 'सावध राहा' असे सांगण्यापेक्षा मुलांना 'स्त्रीचा सन्मान करा' असे शिकवण्याची वेळ आली आहे. मुलीला रात्री बाहेर जाऊ नकोस म्हणण्यापेक्षा रस्ते, सार्वजनिक वाहतूक आणि परिसर सुरक्षित करण्याची जबाबदारी व्यवस्था स्वीकारणार कधी? रक्षाबंधन आपल्याला हाच कठोर प्रश्न विचारते.

आज राखीच्या निमित्ताने प्रत्येक भावाने आपल्या बहिणीला एक वचन द्यावे, तुझ्या स्वप्नांना माझ्या संरक्षणाची नव्हे, माझ्या पाठिंब्याची गरज आहे. तू डॉक्टर होऊ इच्छित असशील तर हो, अधिकारी बनू इच्छित असशील तर बन, व्यवसाय करायचा असेल तर कर, कला-साहित्य क्षेत्रात जायचे असेल तर जा. तुझ्या वाटेतील अडथळा होण्याऐवजी मी तुझ्या पंखांना बळ देईन आणि प्रत्येक बहिणीनेही भावाला एवढेच सांगावे. तुझ्या आयुष्यातील प्रत्येक संघर्षात मी तुझ्या सोबत आहे. कारण भाऊ-बहीण हे केवळ रक्ताचे नाते नसते, ते आयुष्यभराच्या आठवणींचे, भांडणांचे, लाडांचे, काळजीचे आणि निःस्वार्थ प्रेमाचे नाते असते. बालपणीच्या छोट्या छोट्या भांडणांपासून ते मोठेपणीच्या जबाबदाऱ्यांपर्यंत हे नाते सतत बदलत जाते. कधी बहीण आईसारखी काळजी घेते, कधी भाऊ वडिलांसारखा आधार देतो. पण दोघांमध्ये एक गोष्ट कायम असते 'काहीही झाले तरी तू एकटा/एकटी नाहीस' हा विश्वास. म्हणूनच रक्षाबंधन हा फक्त राखी, मिठाई आणि भेटवस्तूंचा उत्सव होऊ नये. तो नात्यांची उजळणी करणारा आणि माणुसकीची बांधिलकी मजबूत करणारा दिवस व्हावा.

आज आपण प्रत्येक स्त्रीच्या सन्मानाची राखी बांधू या. प्रत्येक मुलीच्या शिक्षणाची राखी बांधू या. तिच्या स्वप्नांच्या स्वातंत्र्याची राखी बांधू या. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची राखी बांधू या आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, माणुसकीच्या मनगटावर माणुसकीचीच राखी बांधू या. कारण राखीचा धागा तुटला तर पुन्हा बांधता येतो, पण विश्वासाचा धागा तुटला तर नाते आयुष्यभरासाठी जखमी होते. या रक्षाबंधनाला केवळ बहिणीच्या मनगटावर राखी नको, तिच्या डोळ्यांतील स्वप्नांना सुरक्षित आकाश हवे. तिच्या पावलांना बंधने नकोत, उंच भरारी घेण्याची मोकळीक हवी. आणि भावाच्या प्रेमाला केवळ शब्द नकोत, आयुष्यभराची साथ हवी. रक्षाबंधन म्हणजे एका धाग्याचे नव्हे, तर आयुष्यभर जपलेल्या विश्वासाचे पर्व आहे. सर्व भाऊ-बहिणींना प्रेम, विश्वास, स्नेह आणि अखंड नात्याच्या या पवित्र पर्वाच्या मनःपूर्वक, हृदयस्पर्शी रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

-प्रवीण बागडे,नागपूर

ईद-ए-मिलाद : पैगंबरांचा संदेश आणि माणुसकीची आजची गरज

ईद-ए-मिलाद म्हणजे केवळ एका धार्मिक उत्सवाचा दिवस नाही, तर तो माणुसकीला माणुसकीची जाणीव करून देणारा दिवस आहे. पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जन्मस्मरणाचा हा दिवस त्यांच्या जीवनातील करुणा, समता, बंधुता, संयम, न्याय आणि शांततेच्या संदेशाचे स्मरण करून देतो. आज जग विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत प्रचंड पुढे गेले असले, तरी माणसाच्या मनातील द्वेष, हिंसा, असहिष्णुता आणि भेदभाव अद्याप संपलेला नाही. म्हणूनच ईद-ए-मिलादचा संदेश आज अधिक महत्त्वाचा ठरतो. धर्म माणसाला जोडण्यासाठी असतो; तो माणसामाणसांत भिंती उभ्या करण्यासाठी नसतो. श्रद्धा मनाला नम्र बनवतनसेल, तर त्या श्रद्धेच्या अर्थाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. ईद-ए-मिलादचा खरा अर्थही याच ठिकाणी सापडतो. माणसावर प्रेम करा, दुर्बलाच्या पाठीशी उभे राहा, अन्यायाला विरोध करा आणि समाजात शांतता व बंधुभाव निर्माण करा.

पैगंबर हजरत मोहम्मद यांच्या जीवनाकडे पाहिले तर त्यांच्या संदेशाच्या केंद्रस्थानी माणूस दिसतो. गरीब, अनाथ, विधवा, वंचित आणि दुर्बल घटकांप्रती संवेदनशीलता हा त्यांच्या शिकवणीचा महत्त्वाचा भाग होता. माणसाची प्रतिष्ठा त्याच्या संपत्तीने, वंशाने किंवा सामाजिक स्थानाने ठरत नाही, तर त्याच्या चारित्र्याने आणि कर्माने ठरते, हा विचार समाजाला समतेच्या दिशेने नेणारा आहे. आजच्या समाजासमोर सर्वात मोठे आव्हान कोणते असेल, तर ते माणसामाणसांमधील वाढते अंतर. धर्माच्या नावावर संशय, जातीच्या नावावर तिरस्कार, राजकीय मतभेदांवरून वैर आणि सामाजिक माध्यमांवरील अफवांमुळे निर्माण होणारा द्वेष, ही लोकशाही समाजासाठी धोक्याची चिन्हे आहेत. अशा वातावरणात ईद-ए-मिलादचा संदेश केवळ एका समाजापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण मानवतेपर्यंत पोहोचविण्याची गरज आहे.

आज धार्मिक सणांचे स्वरूपही अनेकदा बदलताना दिसते. सण म्हणजे आनंद, श्रद्धा आणि परस्पर भेटीगाठी यापेक्षा शक्तिप्रदर्शन, मोठमोठे आवाज, दिखावा आणि सोशल मीडियावरील प्रदर्शन यापुरते मर्यादित होत असतील, तर आपण सणाच्या आत्म्यापासून दूर जात आहोत. कोणत्याही धर्माचा उत्सव माणसाच्या दुःखाकडे पाठ फिरवून पूर्ण होऊ शकत नाही. एखाद्या गरीबाच्या घरात अन्न पोहोचले, एखाद्या निराधाराला आधार मिळाला, एखाद्या आजारी व्यक्तीला मदत झाली, एखाद्या दुःखी मनाला दिलासा मिळाला, तरच धार्मिकतेला खरा अर्थ प्राप्त होतो. आज ईद-ए-मिलादच्या निमित्ताने समाजाने याच माणुसकीची मशाल पेटवण्याची गरज आहे.

आज जगात युद्धे सुरू आहेत. निष्पाप नागरिकांचे जीव जात आहेत. धर्म आणि वंशाच्या नावावर माणूस माणसाचा शत्रू बनत आहे. द्वेषाचे राजकारण अनेक ठिकाणी समाजाला अस्थिर करत आहे. अशा वेळी शांतता हा केवळ सुंदर शब्द न राहता तो सामाजिक व्यवहाराचा भाग झाला पाहिजे. भारतासारख्या बहुधर्मी आणि बहुसांस्कृतिक देशात या संदेशाचे महत्त्व आणखी मोठे आहे. भारताची ताकदच विविधतेत आहे. मंदिरातील घंटानाद, मशिदीतील अजान, गुरुद्वारातील कीर्तन, चर्चमधील प्रार्थना आणि बौद्ध विहारातील शांतता, या सर्व आवाजांनी भारतीय संस्कृतीची समृद्ध वीण तयार केली आहे. या विविधतेला संघर्षाचे कारण बनवणे म्हणजे भारताच्या आत्म्यालाच कमकुवत करणे होय. धर्म कोणताही असो, अश्रूंची भाषा एकच असते. भूक कोणत्याही धर्माची नसते. दुःखाला जात नसते. मृत्यूला पंथ नसतो आणि माणुसकीला सीमा नसते. म्हणूनच ईद-ए-मिलाद हा फक्त मुस्लिम बांधवांचा सण म्हणून पाहणे हा त्याच्या व्यापक मानवी संदेशाला मर्यादा घालण्यासारखे आहे. पैगंबरांच्या जीवनातील करुणा, प्रामाणिकपणा, न्याय आणि बंधुभावाचे मू

आज तरुण पिढीसमोरही मोठे आव्हान आहे. सोशल मीडियावर एका क्षणात द्वेष पसरतो. अपूर्ण माहितीवरून निष्कर्ष काढले जातात. अफवा सत्यापेक्षा वेगाने पसरतात. अशा वेळी तरुणांनी विवेक, संयम आणि सत्याची बाजू घेणे आवश्यक आहे. धर्माच्या नावाने कोणताही अपमानास्पद, द्वेषपूर्ण किंवा हिंसक संदेश पुढे पाठवण्यापूर्वी थांबणे हीदेखील सामाजिक जबाबदारी आहे. ईद-ए-मिलादचा खरा उत्सव मशिदीच्या भिंतींपलीकडे आणि मिरवणुकीच्या रस्त्यापलीकडे गेला पाहिजे. तो गरीबाच्या झोपडीपर्यंत, अनाथाच्या डोळ्यांपर्यंत, विधवेच्या दुःखापर्यंत, शेतकऱ्याच्या संघर्षापर्यंत आणि बेरोजगार तरुणाच्या अस्वस्थतेपर्यंत पोहोचला पाहिजे. पैगंबरांच्या जन्मस्मरणाचा दिवस आपल्याला एक साधा पण कठोर प्रश्न विचारतो, आपण श्रद्धाळू झालो, पण आपण खरे माणूस झालो का? जर आपल्या प्रार्थनेनंतरही दुसऱ्याच्या वेदना आपल्याला जाणवत नसतील, तर आपली प्रार्थना अपुरी आहे. जर आपल्या धार्मिक उत्सवात शेजाऱ्याच्या दुःखाला जागा नसेल, तर आपल्या उत्सवाचा अर्थ अपुरा आहे. आणि जर धर्म आपल्याला नम्र, न्यायप्रिय, दयाळू आणि संवेदनशील बनवत नसेल, तर धर्माच्या नावापेक्षा त्याच्या आचरणाकडे पाहण्याची वेळ आली आहे.

ईद-ए-मिलादच्या निमित्ताने आज एक संकल्प करू या, धर्म जपूया, पण माणूसही जपू या, श्रद्धा जपू या, पण संवेदनशीलताही जपू या, आपली ओळख जपू या, पण दुसऱ्याच्या अस्तित्वाचा सन्मानही करू या. कारण शेवटी कोणत्याही धर्माची खरी परीक्षा मंदिरात, मशिदीत किंवा प्रार्थनास्थळी होत नाही, तर ती होते माणूस दुसऱ्या माणसाशी कसा वागतो यामध्ये. ईद-ए-मिलादचा चंद्र आकाशात उगवताना त्याचा प्रकाश एका समाजापुरता मर्यादित राहत नाही. तो सर्वांच्या अंगणात पडतो. त्याचप्रमाणे पैगंबरांचा माणुसकीचा संदेशही एका धर्मापुरता मर्यादित राहू नये. द्वेषाच्या काळोखात माणुसकीचा दिवा पेटवणे,(अन्यायाच्या गर्दीत न्यायाची बाजू घेणे,(भुकेल्याला अन्न देणे आणि दुःखी मनाला आधार देणे, यापेक्षा मोठी ईद कोणती? याच माणुसकीच्या प्रकाशात ईद-ए-मिलाद साजरा झाला, तर तो केवळ धार्मिक उत्सव राहणार नाही; तो माणसाला माणसाशी जोडणारा सामाजिक संकल्प बनेल. ईद-ए-मिलादचा खरा संदेश एकच, (धर्माची ओळख कपड्यांत किंवा घोषणांत नाही, तर ती माणुसकीच्या आचरणात दिसली पाहिजे.

-प्रवीण बागडे,नागपूर

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-४३ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार
राज्यस्तरीय स्पर्धेसाठी नोंदणीकृत व परवानाधारक मंडळांनी सहभागी व्हावे

सोलापूर : राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाकडून पुरस्कार देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत संस्था तसेच संबंधित यंत्रणेकडून परवानाधारक असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची निवड विविध निकषांच्या आधारे करण्यात येणार असून, एकूण १०० गुणांचे मूल्यांकन केले जाणार आहे. त्यामध्ये १. कलांचे जतन व संवर्धन – २० गुण २. संस्कृतीचे जतन व संवर्धन – २० गुण ३. निसर्गाचे व सार्वजनिक संपत्तीचे जतन व संवर्धन – २० गुण ४. सामाजिक कार्य – २० गुण ५. गणेशोत्सव आयोजनातील विधायकता– २० गुण असे प्रत्येक निकषासाठी २० गुण निर्धारित करण्यात आले आहेत.

स्पर्धेतील विजेत्यांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरावर निवड समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी या समितीचे अध्यक्ष असतील. शासकीय कला महाविद्यालयातील कला प्राध्यापक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि जिल्ह्यातील पोलीस अधिकारी हे सदस्य असतील. जिल्हा नियोजन अधिकारी हे सदस्य सचिव असतील. तसेच प्रयोगात्मक कला क्षेत्रातील एक आणि दृश्यकला क्षेत्रातील एक अशा दोन कलाकारांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली निवड समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत मुख्याधिकारी, महानगरपालिकेचे संबंधित वॉर्ड अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागातील विद्युत/ स्थापत्य उपअभियंता आणि पोलीस निरीक्षक अथवा संबंधित पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. तसेच संबंधित तालुक्यातील प्रयोगात्मक कला व दृश्यकला क्षेत्रातील प्रत्येकी एक अशा दोन कलाकारांची अशासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या स्पर्धेचे समन्वयक म्हणून संचालक, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी काम पाहणार आहेत.

स्पर्धेत केवळ नोंदणीकृत संस्था अथवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनाच सहभागी होता येईल. पात्र मंडळांनी अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या ganeshotsav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

जिल्हा, राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर गणेशोत्सवाचे आयोजन करणाऱ्या पात्र सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या स्पर्धेत सहभागी होऊन कला, संस्कृती, पर्यावरण संवर्धन, सामाजिक कार्य आणि विधायक उपक्रमांच्या माध्यमातून आपले योगदान अधोरेखित करावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा नियोजन समिती, सोलापूरचे दिलीप पवार यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये जलसंधारण काळाची गरज विषयावर व्याख्यान संपन्न

सांगोला :फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी मध्ये जलसंधारण काळाची गरज' या विषयावर महादेव घोंगडे यांचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून महादेव घोंगडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री सुधाकराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन वक्ते माजी मुख्याध्यापक महादेव घोंगडे, प्राचार्य डॉ. संजय बैस, प्रा.अश्विनी झाडे, प्रा. अमृता पिंजारी आदींच्या हस्ते करण्यात आले.

प्रमुख वक्ते महादेव घोंगडे बोलताना म्हणाले, पाण्याचे मानवी जीवनातील महत्त्व, दिवसेंदिवस कमी होत चाललेली भूजलपातळी, पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन, जलस्रोतांचे पुनर्भरण, बंधारे, शेततळी तसेच पाणी बचतीच्या विविध उपाययोजनांवर सविस्तर माहिती दिली.

'पाणी वाचवा, पाणी जिरवा या कार्यक्रमादरम्यान उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी जलसंधारणाची शपथ घेतली. पाण्याचा अपव्यय टाळणे, जलस्रोतांचे संरक्षण करणे आणि समाजामध्ये जलसंधारणाबाबत जनजागृती करणे, असा संकल्प यावेळी करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. नितीन माळी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा.अश्विनी झाडे यांनी मानले.

पोलीस बांधवांसोबत चिमुकल्यांनी साजरा केला रक्षाबंधनाचा स्नेहबंध

सांगोला : सक्षम सोशल फाउंडेशन संचलित लिटल मिलेनियम प्रीस्कूल, सांगोला येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सांगोला पोलीस ठाण्यात पोलीस बांधवांसोबत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात रक्षाबंधनाचा सण साजरा केला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी पोलीस बांधवांना राखी बांधून त्यांच्या निःस्वार्थ सेवा, कर्तव्यनिष्ठा आणि समाजाच्या सुरक्षेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

चिमुकल्यांच्या निरागस प्रेमाने आणि आपुलकीने पोलीस बांधवांच्या चेहऱ्यावरही आनंद फुलला. विद्यार्थ्यांना पोलीस दलाची कार्यपद्धती, समाजातील त्यांची भूमिका आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी ते बजावत असलेल्या जबाबदारीची ओळख करून देण्यात आली. रक्षाबंधनाच्या माध्यमातून प्रेम, आदर, कृतज्ञता आणि सामाजिक बांधिलकीची मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा हा सुंदर प्रयत्न ठरला. या प्रसंगी सक्षम सोशल फाउंडेशनच्या लिटल मिलेनियम प्रीस्कूल, सांगोला च्या शिक्षकवृंदांनी व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय अनुभव ठरला. सदर उपक्रमाचे आयोजन कॅम्पस इन्चार्ज पूजा पतंगे, मयुरी फुले, पल्लवी पांढरे, आरझू शेख, ऋतुजा नवले, ज्योती गंभीरे – पाटील यांनी केले.

पंढरपूर रेल्वे स्टेशन येथे लोहमार्ग पोलीस ठाणे इमारत मंजूर करावी– कामटे संघटना

सांगोला : शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने लोहमार्ग पोलिस स्टेशन पंढरपूर येथे सुरू करण्यात यावे, या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आल्याची माहिती संघटनेचे संपर्क प्रमुख हरी बाबर यांनी दिली.

महाराष्ट्राचे मुख्य देवस्थान पंढरपूर येथे असल्याने विठ्ठल रुक्मिणी दर्शनासाठी भारतातून भाविक , भक्तगण,वारकरी संप्रदाय येतात. रेल्वे प्रवासी संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. क्राईम ,रेल्वे अपघात, जखमी, प्रमाणात वाढ होत आहे. पंढरपूर स्टेशनवर रेल्वे पोलीस लोहमार्ग चौकी लहान असून पावसाळ्यात पाणी गळत आहे. बसण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. तसेच पंढरपूर वारीच्या वेळी पुणे लोहमार्ग येथून १०० ते २०० पोलीस कर्मचारी बंदोबस्त करण्यासाठी येतात. त्यांना बसण्यासाठी जागा नाही. जसे आर पी एफ यांना जशा सोई सुविधा मिळतात त्याप्रमाणे जी आर पी यांना देण्यात याव्यात.

पुढील काही दिवसात रेल्वेच्या हद्दीतील कवठेमहांकाळ, ढालगाव, डोंगरगाव, सांगोला क्राईमच्या छोट्या–तक्रारीला सुद्धा प्रवाशांना कुर्डूवाडी या ठिकाणी जावे लागत असल्याने प्रवाशांना याचा मनस्ताप, त्रास होत आहे , याची अनेक प्रवाशांनी संघटनेकडे मागणी केली आहे,पंढरपूर येथे स्वतंत्र लोहमार्ग पोलीस ठाणे निर्मिती/ मुख्यमंत्री कार्यालयाकडून मंजूर झाल्यास प्रवाशांना वेळेत तक्रार देता येणे शक्य होणार आहे. याचा मुख्यमंत्री कार्यालय, रेल्वे विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे. पंढरपूर येथे नवीन पोलीस ठाणे होणार आहे, तरी येथे ३ ते ४ मजली इमारत बांधून लवकरात लवकर इमारत बांधुन रेल्वे प्रशासनाने द्यावी. कुर्डूवाडी लोहमार्ग पोलीस ठाणे अंतर्गत पंढरपूर दुरक्षेत्र आहे.पंढरपूरला वर्षात चार मोठ्या वारी आहेत, वारीच्या वेळी रेल्वे गाड्या संख्या वाढवली जाते त्यामुळे प्रवासी वाढले जातात.

गर्दीमुळे रेल्वे अपघात , गुन्हे होतात. विशेषत प्रवाशी महिलांना तक्रार दाखल करायची असल्यास कुर्डुवाडी लोहमार्ग पोलीस ठाण्यात जावे लागते.मिरज ते कुर्डुवाडी अंतर १९० किलोमीटर आहे. मिरज येथून येणाऱ्या–निलकंठ शिंदे सर प्रवासी यांना तक्रार देण्यासाठी कुर्डुवाडी येथे जावे लागते.

तरी दोन्ही पोलीस ठाण्यात अंतर जास्त असल्याने प्रवाशांची गैरसोय होते आहे पंढरपूर येथे लोहमार्ग पोलीस ठाणे होणे गरजेचे आहे.पंढरपूर येथे लोहमार्ग पोलीस ठाणे झाल्यास प्रवाशांची सोय होईल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक सोलापूर यांनी तात्काळ पंढरपूर रेल्वे स्थानकावर इमारत मंजुरी द्यावी,पंढरपूर लोहमार्ग पोलीस ठाण्याची इमारत निर्मिती करावी अशी आग्रही मागणी शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेने केली आहे. यावेळी संघटनेचे सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

सांगोला विद्यामंदिरमध्ये तब्बल ८९ माजी सैनिकांना कृतज्ञतेचा पवित्र धागा बांधून सैनिक रक्षाबंधन

सां.ता.शि.प्र.मंडळ व सांगोला विद्यामंदिर अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रभक्तीचा अनोखा जागर

सांगोला : बहिणीच्या भावावरील निरपेक्ष प्रेमाचे आणि भावाने घेतलेल्या तिच्या रक्षणाच्या जबाबदारीचे प्रतीक म्हणजे रक्षाबंधन. याच भावनिक विणला प्रमाण मानून, देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व सांगोला विद्यामंदिर अमृत महोत्सवी वर्ष २०२६-२७ निमित्त 'सैनिक रक्षाबंधन व शौर्य सन्मान' हा अत्यंत भावनिक व अनोखा उपक्रम सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज सांगोला येथे राबवण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर भारतीय माजी सैनिक संघटना सोलापूर अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे, संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, प्राचार्य चारुदत्त जगताप, ड्रीम फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी,करांडे इंटरनॅशनल स्कूलचे श्रीधर करांडे,माजी सैनिक कल्याणकारी संघटना सांगोला अध्यक्ष रावसाहेब साळुंखे,जय जवान माजी सैनिक सेवाभाव संस्था सांगोला अध्यक्ष सिद्धेश्वर पाटील,उपाध्यक्ष रविकांत मराळ,तसेच चिणके, राजापूर, सोनंद जवळा, मानेगाव, मंगळवेढा, वासुद, अकोला, कडलास मानेगाव बुद्रुक, कोळा आदि गावातील माजी सैनिक संघटना अध्यक्ष उपस्थित होते.

जिल्ह्यात पहिल्यांदाच संपन्न झालेल्या या भव्य सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ सैनिकांना सन्मानित करण्याचा संस्थेचा संकल्प होता. मात्र,या उपक्रमाला साद देत तब्बल ८९ माजी सैनिक या सोहळ्यासाठी उपस्थित राहिले.सीमेवर ऊन-पावसाची तमा न बाळगता रक्षण करणाऱ्या या शूरवीर भावांच्या मनगटावर जेव्हा सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थिनींनी कृतज्ञतेची राखी बांधली आणि सन्मानचिन्ह दिले, तेव्हा संपूर्ण सभागृह भारावून गेले. या वीर जवानांनीही बहिणीच्या नात्याने सर्व विद्यार्थिनींना शालेय साहित्याची भेटवस्तू देऊन त्यांच्या पाठीवर वात्सल्याची थाप दिली.

सन्मान सोहळ्याच्या सुरुवातीला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,थोर स्वातंत्र्यसेनानी,देशभक्त कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजच्या एनसीसी कॅडेटने माजी सैनिकांना मानवंदना दिली. संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांनी प्रास्ताविकात थोर स्वातंत्र्यसेनानी बापूसाहेबांचे तत्त्वनिष्ठ विचार आणि त्यांच्या अतीव राष्ट्रभक्तीचा विचार पुढच्या पिढीतही रुजावा आणि मातृभूमीचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त व्हावी,याच उदात्त हेतूने संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे असे सांगत कार्यक्रमाचा हेतू विषद केला व उपस्थितांचे स्वागत केले यावेळी ड्रीम फाउंडेशन सोलापूरचे संस्थापक अध्यक्ष काशीनाथ भतगुणकी यांनी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना माजी सैनिकांकडून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

देशासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या सैनिकांविषयी कायम आदरभाव ठेवा असे सांगितले. तसेच भारतीय माजी सैनिक संघटना सोलापूरचे अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे यांनी जवान, शेतकरी आणि शिक्षक हे देशाच्या जडणघडणीचे महत्त्वपूर्ण आधारस्तंभ असल्याचे सांगितले. देशाला संरक्षण दृष्ट या बलशाही करण्यासाठी सैनिक कार्य करत असतात, त्यामुळे सैनिकांविषयी आणि जन्म देणाऱ्या आईवडिलांविषयी नेहमी आदर बाळगा, मोबाईलपासून दूर राहा आणि वाचन संस्कृती वाढवा, असा मोलाचा विचार त्यांनी दिला व आयोजनाबद्दल संस्थेचे भरभरून कौतुक केले.

या सोहळ्यासाठी माजी सैनिक,संस्थेचे पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी,शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या राष्ट्रभक्तीने भारावलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. धनाजी चव्हाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्राचार्य चारूदत्त जगताप यांनी मानले.

नाझरे परिसरात चोरांचा सुळसुळाट; विहीर, बोरवेलच्या वायर, मोटारी चोरीने शेतकरी हैराण

सांगोला : नाझरे व परिसरात चोराचा सुळसुळाट वाढला असून, माण, बेलवन नदीकाठच्या शेतातील विहिरी, बोरवेलच्या विद्युत पंपांना जोडलेल्या वायर चोरीच्या व मोटारी चोरीच्या घटनेने शेतकरी वर्ग हैराण झाला असून, आधीच पावसाच्या दीर्घ खंडामुळे खरीप हंगाम संकटात सापडला असताना, त्यातच चोरट्याकडून होत असलेल्या मोटारी, विहरी व बोरवेलच्या वायर चोरीमुळे या परिसरातील शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला आहे, त्यामुळे रात्री पोलीस गस्त नियमितपणे सुरू करावी अशी शेतकरी वर्गातून केली जात आहे. शेतकऱ्यांना पाणीपुरवठा व शेती कामासाठी या विद्युत पंपावर अवलंबून राहावे लागते व नवीन वायर बसविण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, वायर चोरीच्या घटना वाढल्यामुळे अगोदरच खरीप हंगाम संकटात असताना आता या चोरीमुळे विहिरी व बोरवेलच्या विद्युत पंपाच्या वायर चोरीच्या घटनाचा तातडीने तपास करून चोरट्याचा बंदोबस्त करावा व नाझरे परिसरात रात्रीची पोलीस गस्त गरजेची आहे असे शेतकरी वर्गात बोलले जात असून, शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे नुकसान रोखण्यासाठी संबंधित पोलीस प्रशासन, ग्रामपंचायत, ग्रामस्थ या सर्वांनी जातीने लक्ष घालावे. आधीच पावसाचा पत्ता नाही त्यात विजेची अनियमित्ता आणि खरीप पिकावरील संकट यामुळे शेतकरी हैराण झाला असून, चोरीच्या घटनांना आळा घालावा आणि शेतकऱ्यांना दिलासा देणे सध्या तरी गरजेचे आहे.

शेतकऱ्याच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. जून महिन्यापासून समाधानकारक पाऊस नसल्याने या परिसरातील खरीप हंगामावर मोठे संकट असताना या नैसर्गिक संकटाचा सामना करत असतानाच चोरीच्या प्रकारामुळे शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट निर्माण झाले आहे.

माजी नगरसेवक सोमेश यावलकर व नगरसेविका सौ.आशादेवी सोमेश यावलकर यांच्या पुढाकारातून शिवसेनेच्यावतीने महिलांसाठी मोफत 'श्रावणमास यात्रा'; दोन वर्षांपासून स्वखर्चातून उपक्रम

सांगोला : माजी नगरसेवक सोमेश यावलकर व नगरसेविका सौ.आशादेवी सोमेश यावलकर यांच्या पुढाकारातून शिवसेनेच्यावतीने सांगोला शहरातील महिलांसाठी मोफत 'श्रावणमास यात्रा' आयोजित करण्यात आली आहे.

गेल्या दोन वर्षांपासून हा सामाजिक व धार्मिक उपक्रम स्वखर्चातून सातत्याने राबविण्यात येत असून, यंदाही महिलांसाठी विशेष बसची व्यवस्था करण्यात आली आहे. ही श्रावणमास यात्रा बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ७.३० वाजता सांगोल्यातून रवाना होणार आहे.

या श्रावणमास यात्रेत महिलांना विविध धार्मिक स्थळांचे दर्शन घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून, प्रवासाची संपूर्ण व्यवस्था मोफत करण्यात आली आहे. श्रावणमास यात्रेसाठी १५ ते ६० वयोगटातील महिला सहभागी होऊ शकतात. सहभागी महिलांनी दुपारच्या जेवणासाठी स्वतःचा डबा सोबत आणावा. तसेच पावसाळ्याचे वातावरण लक्षात घेऊन छत्री अथवा रेनकोट सोबत ठेवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पाच वर्षांखालील मुलांना आईसोबत येण्याची सुविधा आहे. श्रावणमास यात्रेसाठी इच्छुक महिलांनी दि.१ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत नावनोंदणी करावी. अधिक माहितीसाठी ८३९०६४१०६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

महिलांना धार्मिक पर्यटनाची संधी उपलब्ध करून देतानाच त्यांच्यासाठी सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविला जात असल्याने माजी नगरसेवक सोमेश यावलकर व नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या या स्वखर्चातून सुरू असलेल्या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता